# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125


**दिन विशेष...**

१२९४ : देवगिरीच्या यादव साम्राज्याचा अस्त

१६६४ : शिवरायांनी आपले ठाण रायगडावर मातोश्री जिजाईच्या सहवासात मांडले.

१९२२ : पुणे विद्यापीठाने वृत्तपत्रविद्या अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला.

१९२२ : सुप्रसिद्ध कीर्तनकार बाबामहाराज सातारकर यांचा जन्म

सेन्सेक्स ८३,८१७.६९ +७८.५५ (०.०९४%)

डॉलर ₹ ९०.४१

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३२ | १५ |
| दिल्ली | २३ | १० |
| मुंबई | ३६ | २१ |
| नागपूर | ३० | १६ |
| पुणे | ३१ | १३ |


epaper.shauryamarathi.com

जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ८७ किंमत : ५ रु. | पाने ४


**सुविचार**

स्वत:ला कधीही कमी लेखू नका; तुमच्या आत्मविश्वासाने अशक्य गोष्टी सुद्धा शक्य होऊ शकतात.

| सूर्योदय | - | सूर्यास्त |
|---|---|---|
| स.-७:०४ | | संध्या-६:२० |

**सोने – चांदी**

| सोने(१० ग्रॅम) | - चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५५,४७०/- | २,८०,०००/- |

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०

पिल बाग : ११०१ ते ११०२

कांदे बाग : ----

# ग्रामीण अर्थव्यवस्था बळकटीकरणासाठी सरकारचा गोदरेज अ‍ॅग्रोव्हेटसोबत करार

## राज्यातील ९ कापूस उत्पादक जिल्ह्यांतील ५ हजारांहून अधिक महिला शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणार

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील पाच हजार महिला शेतकऱ्यांना शाश्वत शेतीचे प्रशिक्षण देण्यासाठी राज्य सरकारने मंगळवारी 'गोदरेज अ‍ॅग्रोव्हेट'सोबत सामंजस्य करार केला. शेतकरी हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांमध्ये महिलांची भूमिका निर्णायक आहे. गोदरेज अ‍ॅग्रोव्हेटसोबतचा हा करार शाश्वत शेती, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकटीकरणासाठी फायद्याचा ठरेल, असा विश्वास यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**



राज्यातील महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली गोदरेज अ‍ॅग्रोव्हेट लिमिटेड आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम उमेद) यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे राज्यातील ९ कापूस उत्पादक जिल्ह्यांतील ५ हजारांहून अधिक महिला शेतकऱ्यांना शाश्वत व आधुनिक शेती पद्धतींचे प्रशिक्षण मिळणार आहे. यावेळी फडणवीस यांनी, हजारो कुटुंबांची उपजीविका शेतीवर अवलंबून असून, त्यातील अनेक कुटुंबांचे नेतृत्व कर्तृत्ववान महिला करत आहेत. अशा शेतकऱ्यांना सुलभ कर्ज आणि आवश्यक मदत वेळेवर मिळावी, यासाठी सरकार कटीबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

गोदरेज अ‍ॅग्रोवेटसोबतची भागीदारी ही शाश्वत कृषी पद्धती आणि लैंगिक समावेशनाबाबत आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक शेती पद्धतींच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विशेषत: महिला शेतकरी आत्मनिर्भर बनून राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान देतील, यासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरेल.

महिला शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेती पद्धती, बाजारपेठेतील संधी आणि माहितीपूर्ण निर्णयक्षमतेस सक्षम करून, हा उपक्रम शेती उत्पादनक्षमता, उपजीविका आणि ग्रामीण टिकाऊपणा यामध्ये दीर्घकालीन सुधारणा साधण्याचा यशस्वी प्रयत्न असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### ➤ जळगावसह नऊ जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता गटातील महिलांना प्राधान्य

या योजनेच्या पहिल्या टप्प्यात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, परभणी, जळगाव, बीड, अकोला आणि नांदेड या ९ जिल्ह्यांचा समावेश आहे. सुमारे ५० हजार एकर क्षेत्रावर ५ हजारांहून अधिक महिला शेतकरी आणि १०० स्वयंसहायता गट या उपक्रमाचा लाभ घेणार आहेत. पुढील तीन वर्षांत हा उपक्रम ५०० हून अधिक स्वयंसहायता गटांपर्यंत विस्तारण्यात येणार आहे. तसेच कापसाबरोबरच मका व इतर पिकांपर्यंत पोहोचवण्याचा मानस आहे. या कराराअंतर्गत एमएसआरएलएम उमेदकडून स्वयंसहायता गट व कृषी सखी नेटवर्कद्वारे महिला शेतकऱ्यांचे संघटन व समन्वय साधला जाणार आहे. तर गोदरेज अ‍ॅग्रोव्हेटकडून प्रशिक्षण कार्यशाळा, प्रात्यक्षिक शेतजमिनी, शेतकरी क्षेत्रशाळा व सुरक्षितता किट्स पुरवण्यात येणार आहेत.

# लाडक्या बहिणींचे पैसे कायमस्वरूपी थांबणार

• ई-केवायसी पडताळणी नावालाच !




वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या सुमारे २० लाख महिलांचे अनुदान ई-केवायसी पडताळणीसाठी थांबविण्यात आले आहे. ज्यामध्ये जळगाव जिल्ह्यातील सुमारे एक लाखांवर महिलांचा समावेश आहे. संबंधित सर्व महिलांची ई-केवायसी पडताळणी पूर्ण करण्याची जबाबदारी अंगणवाडी सेविकांवर टाकण्यात आली आहे. मात्र, ही पडताळणीची प्रक्रिया नावालाच सुरू आहे. संबंधित सर्व महिलांचे पैसे कायमस्वरूपी थांबविण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे.**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना राज्यातील महिलांसाठी मोठा आधार ठरली असून, त्या माध्यमातून दरमहा १,५०० रुपयांची थेट आर्थिक मदत दिली जात आहे. मात्र, या योजनेच्या अंमलबजावणीतील काही तांत्रिक अडचणींमुळे लाखो महिलांना नियमित लाभापासून वंचित राहावे लागले आहे. ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न झाल्याने तसेच काही ठिकाणी कागदपत्रांतील त्रुटींमुळे अनेक महिलांचे अनुदानाचे हप्ते ऑक्टोबरनंतर थांबविण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, काही महिलांनी ई-केवायसी पूर्ण करूनही त्यांच्या खात्यात नियमित १,५०० रुपयांची रक्कम जमा झालेली नाही. त्यामुळे तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. काही भागांत तर संतप्त महिलांनी थेट रस्त्यावर उतरून आंदोलन केल्याचेही चित्र पाहायला मिळाले आहे. या पार्श्वभूमीवर महिला व बालविकास विभागाने गंभीर दखल घेत संबंधित लाभार्थी महिलांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष चौकशी करण्याचे आदेश अंगणवाडी सेविकांना दिले आहेत. त्यानुसार, सखोल पडताळणी होणे अपेक्षित आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेंतर्गत संबंधित महिलांची ई-केवायसी पडताळणी पूर्ण न झाल्यामुळे हा लाभ रखडला असून, या प्रक्रियेची जबाबदारी अंगणवाडी सेविकांवर सोपविण्यात आली आहे. मात्र, सर्वच अंगणवाडी सेविकांनी ही जबाबदारी स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिल्याने संपूर्ण यंत्रणाच ठप्प झाली आहे. राज्य शासनाने योजनेतील (पान २ वर)

## थोडक्यात

### स्वीकृतसाठी तब्बल सव्वा कोटीची बोली!

**नाशिक ।** त्र्यंबकेश्वर नगरपरिषदेत स्वीकृत नगरसेवकपद मिळविण्यासाठी चढाओढ सुरू झाली आहे. त्यातूनच या पदासाठी सव्वा कोटी रुपयाची बोली लागल्याची चर्चा आहे. स्वीकृत नगरसेवक निवडताना जनतेतील विचारवंत, समाजसेवक, उच्चशिक्षित, अनुभवी व्यक्तींची निवड करणे अभिप्रेत आहे. यामुळे सभागृहाचे कामकाज करताना तसेच शासनदरबारी संवाद करताना उपयुक्त ठरते. त्यातही डॉक्टर, वकील आदी प्रतिष्ठीतांना संधी द्यावी, अशा सूचना आहेत. त्यातही आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर अनुभवी, ज्येष्ठ माजी नगरसेवक, नगराध्यक्ष अथवा नगरसेवकांना स्वीकृत नगरसेवक म्हणून निवडल्यास सिंहस्थ यशस्वी करण्यास मदत होईल.

### १० फेब्रुवारीपासून बारावीची परीक्षा

**जळगाव।** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत दि.१० फेब्रुवारीपासून बारावी तर दि.२० फेब्रुवारीपासून दहावीच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. जिल्ह्यात या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी शिक्षण विभागांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी. विद्यार्थ्यांकडून परीक्षेत कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब होणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी. परीक्षा केंद्रात गैरप्रकार आढळल्यास तत्परतेने कायदेशीर कार्यवाई करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले. गैरप्रकार होऊ नये, यासाठी सर्व परीक्षा केंद्रांतील वर्ग खोल्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावणे आवश्यक आहे. गटशिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित केंद्रप्रमुखांना सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबाबत लेखी सूचना दिल्या आहेत.

## अनुदानासाठी २५ कोटींची तरतूद ; ई-वाहन पुरवले जाणार

# रोजगारासाठी दिव्यांगांना मिळणार फिरते दुकान

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्य सरकारच्या दिव्यांग कल्याण विभागाकडून अपंगांना रोजगारक्षम बनविण्यासाठी त्यांना फिरत्या दुकानांसाठी अनुदान दिले जाते. याअंतर्गत अपंग व्यक्तींना ई- वाहन पुरविले जात असून निधीअभावी ही योजना रखडली होती. या योजनेला आता पुन्हा गती देण्यात आली असून यासाठी सरकारच्या दिव्यांग कल्याण विभागाकडून २५ कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.**



यामुळे अपंग व्यक्तींना रोजगारासाठी ई-वाहनावरील फिरते दुकान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अपंगांना फिरते ई-वाहन दुकान पुरविण्यासाठी सरकारकडून जिल्हा परिषदांना निधी पुरविला जातो. याअंतर्गत पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (ई-टेम्पो मोबाईल शॉप ऑन व्हेईकल) पुरविले (पान २ वर)

### ➤ योजनेचे उद्देश काय आहेत?

**दिव्यांग व्यक्तींना पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करुन रोजगार निर्मितीस चालना देणे. त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे. सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणे दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या कुटुंबीयांसह जीवन जगण्यास सक्षम करणे. हा शासनाचा प्रमुख उद्देश आहे.**

# शासकीय आश्रमशाळेचे रूपांतर 'मॉडेल स्कूल'मध्ये होणार

## आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांचे आदेश

वृत्तसंस्था । अकोले

**आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत शासकीय आश्रम शाळेचे रूपांतर 'मॉडेल स्कूल'मध्ये करण्याचे आदेश आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिले आहेत.**



याबरोबरच अकोले तालुक्यातील पर्यटन विकास निधीत वाढ करण्याची सूचना अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केली आहे. जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम (२०२६-२०२७) प्रारूप आराखडा अंतिम करण्यासाठी आदिवासी विकास मंत्री डॉ. उईके यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने पालकमंत्री विखे-पाटील यांनी संवाद साधला. यावेळी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आ.डॉ. किरण लहामटे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, (पान २ वर)

# कुठेतरी काहीतरी गडबड आहे...?

## • अजित पवारांच्या विमान अपघातावर छगन भुजबळांचं मोठं वक्तव्य

वृत्तसंस्था । छ. संभाजीनगर

**गेल्या काही दिवसांपासून राज्याचे राजकारण शोकमग्न झाले आहे. त्या मागील मोठे कारण म्हणजे अजित पवारांचे अपघाती निधन. २८ जानेवारी रोजी दादांच्या विमानाला अपघात झाला होता. कुठेतरी काहीतरी गडबड आहे,अशी शंका छगन भुजबळ यांनी व्यक्त केली.**



ते मुंबईवरुन सकाळी निघाले होते. त्यांना बारामतीमध्ये उतरायचे होते. पण नियतीला ते मान्य नव्हते. बारामतीमध्ये विमानाचे लँडिंग करताना विमानाला अपघात झाला आणि विमानातील सर्व प्रवासी एका क्षणात संपले. त्यामध्ये अजित पवारही होते. एकूण पाच प्रवासी त्या दुर्दैवी अपघातात निधन पावले.

दरम्यान, आज नाशिकमध्ये स्वर्गीय अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. माजीमंत्री छगन भुजबळ आणि माजी खासदार समीर भुजबळ, पंकज भुजबळ यांनी स्वर्गीय अजित पवार यांच्या अस्थी नाशिकच्या कालिदास कला मंदिर या ठिकाणी आयोजित शोकसभेत आणल्या. शोकसभा संपल्यानंतर रामकुंड परिसरात या अस्थींचे विसर्जन करण्यात आले. या शोकसभेदरम्यान मंत्री छगन भुजबळ यांनी बोलताना पुन्हा एकदा माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांचा झालेला विमान अपघात याबाबत शंका उपस्थित केली. देशात आणि राज्यात असे अनेक अपघात झाले. मात्र, अजितदादा यांचा झालेला हा अपघात अशा प्रकारचा अपघात, एवढ्या मोठ्या व्यक्ती बाबतचा अपघात पहिल्यांदाच मी अनुभवत असल्याचं त्यांनी यावेळी म्हटलं आहे. त्यानंतर बोलताना ते म्हटले की, मी त्या ठिकाणचे काही सीसीटीव्ही देखील बघितले. त्यामध्ये सरळ येत असलेलं विमान एकदम पलटी झाले. त्यामुळे कुठेतरी काहीतरी गडबड (पान २ वर)

### डॉलरच्या तुलनेत रुपया झाला मजबूत

वृत्तसंस्था । मुंबई

भारत-अमेरिका व्यापार करार लवकरच होणार आहे. अशा परिस्थितीत भारताची निर्यात वाढणार आहे आणि चालू खात्यावरील तूट कमी होणार आहे. यामुळे रुपयाचे मूल्य मंगळवारी तब्बल १२२ पैसे म्हणजे १.२२ टक्क्यांनी वाढून ९०.२७ रुपये प्रतिडॉलर या पातळीवर गेले. गेल्या १३ महिन्यांपासून डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य सहा टक्क्यांनी घसरले आहे. ही तूट एकाच दिवसात बऱ्याच प्रमाणात भरून निघाली. विश्लेषकांनी सांगितले की, आता निर्यात वाढल्यामुळे भारतात परकीय गुंतवणूक वाढणार आहे.

## संपादकीय

### ही तडजोडच

अमेरिकेने भारतावरचे आयात शुल्क ७ टक्क्यांनी कमी करून ते १८ टक्के इतके केले आहे. याआधी भारतातून अमेरिकेत आयात केल्या जाणाऱ्या मालावर २५% शुल्क डोनाल्ड ट्रम्प यांनी लागू केले होते. त्यामुळे भारतातून अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीवर त्याचा विपरीत परिणाम झाला होता. त्यामुळे अमेरिकेशी तडजोड करण्यासाठी भारत सरकार गेले बरेच दिवस प्रयत्नशील होते. त्याला यश आल्याचा दावा सरकारी बाजूकडून केला जात आहे. पण वस्तुस्थिती अत्यंत विपरीत असल्याचेच निदर्शनाला येत आहे. मागच्या काही वर्षांची आकडेवारी पाहिली तर असे लक्षात येते की, भारताकडून अमेरिकेला जो माल निर्यात होत होता, त्यावर अमेरिकेत जेमतेम ३ ते ४ टक्के इतकेच आयात शुल्क लावले जात होते. आता नवीन घोषणेनुसार ते १८% इतके असणार आहे. म्हणजे मूळ जे आयात शुल्क होते त्यापेक्षा किमान १३ ते १४ टक्के वाढीव आयात शुल्क अमेरिकेकडून लागूच राहणार आहे. आधी शंभर रुपये वाढवून सांगायचे त्यानंतर २० रुपये कमी केले म्हणून डांगोरा पिटायचा या बाबीला जसा अर्थ नसतो तसाच हा प्रकार आहे. त्याहीपेक्षा भीषण बाब म्हणजे अमेरिकेतून जो माल भारतात आयात होणार आहे त्या मालावर मात्र भारत सरकार शून्य टक्के आयात शुल्क लावणार आहे. म्हणजे अमेरिकन मालावर भारतात एक रुपयाचेही आयात शुल्क भारत सरकारला मिळणार नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेतली, तर अमेरिकेशी झालेले हे डील अंतिमतः देशासाठी नुकसानकारकच ठरणार आहे हे अगदी स्पष्ट दिसते आहे. अमेरिकेतून कृषिमाल आणि दुग्धजन्य पदार्थ भारतात शून्य टक्के दराने आयात केले जाणार असतील तर भारतात उत्पादित होणाऱ्या कृषी मालापेक्षा अमेरिकेहून आयात केला जाणारा माल देशात अगदी स्वस्तात विकला जाईल, त्यातून भारतीय कृषी उत्पादकांचे नुकसान संभवते. नुसते नुकसान नव्हे तर येथील शेतकरी त्यातून उद्ध्वस्त होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# ...अन्यथा मालमत्ता होणार जप्त

## थकबाकीदार ६१८८ जणांना जप्तीपूर्वीच्या नोटीस बजवायला सुरुवात




### ● ...तर मालमत्तेचा होणार लिलाव

**मालमत्ता जप्तीनंतरही थकबाकी वसूल न झाल्यास महानगरपालिका ज्या मालमत्तेचा कर थकीत आहे, अशा मालमत्तेचा लिलाव करून रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करणार आहे. मालमत्ता जप्ती, मालमत्तेचा लिलाव ही कार्यवाही थांबविण्यासाठी नागरिकांनी तात्काळ मालमत्ता कराचा १०० टक्के भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन धुळे महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.**

प्रतिनिधी । धुळे

**महापालिका प्रशासनातर्फे मालमत्ता कर वसुलीला वेग देण्यात आला आहे. अधिकाधिक कर भरणा व्हावा, यासाठी मनपाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून तब्बल ६ हजार १८८ मालमत्ता कर थकबाकीदारांना मनपाकडून जप्तीपूर्वीच्या नोटीस बजवायच्या कार्यवाहीला सुरुवात करण्यात आली आहे. नोटीस बजावल्यानंतरही थकबाकी न भरल्यास मालमत्ता जप्तीची कार्यवाही करण्यात येणार असल्याचा इशारा मनपा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.**

धुळे महानगरपालिकेमार्फत मालमत्ता कर वसुलीसाठी गतीने कार्यवाही करण्यात येत आहे. यासाठी आयुक्त तथा प्रशासक नितीन कापडणीस यांनी मालमत्ता कर विभागाची बैठक घेऊन याबाबत सक्त आदेशित केले आहे. थकबाकीदार मालमत्ता धारकांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. मालमत्ता कर वसुलीसाठी ६ हजार १८८ मालमत्ताधारकांना जप्तीपूर्व नोटीस देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

ज्या मालमत्तांना जप्तीपूर्व नोटीस बजावण्यात आली आहे. त्यांच्याकडून जप्ती कार्यवाहीचा खर्च म्हणून १० टक्के दंड आकारण्यात येणार आहे. जप्तीपूर्व नोटीस दिल्यानंतरही थकबाकी न भरल्यास मनपा स्थावर व जंगम मालमत्ता जप्तीची कार्यवाही करणार असल्याची माहिती आयुक्त नितीन कापडणीस यांनी दिली आहे. कारवाई टाळण्यासाठी नागरिक व थकबाकीदारांनी वेळीच कराचा भरणा करावा, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

# खेडीभोकरी-भोकर दरम्यान फुफाट्यामुळे अपघातांचा धोका

## गोरगावलेच्या माजी सरपंचांची रस्त्यावर रेती, मुरूम, पाणी टाकण्याची मागणी



प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील खेडीभोकरी ते भोकरदरम्यान तापी नदीच्या खोऱ्यात बनविण्यात आलेला कच्चा रस्ताच्या फुफाट्यामुळे हा रस्ता अपघातांना आमंत्रण देणारा ठरत आहे. या रस्त्यावर पाणी, रेती, मुरूम टाकून रस्ता त्वरित पक्का करावा, अशी मागणी चोपडा मार्केट कमिटीचे माजी संचालक व गोरगावलेचे माजी सरपंच जगन्नाथ बाविस्कर यांनी केली आहे.**

तापी नदीच्या काठावर हा रस्ता बनविण्यात आला आहे. या रस्त्यावर गाळमिश्रीत मातीमुळे मोठ्याप्रमाणात धूळ होत आहे. लहान, मोठ्या वाहनांच्या वापरामुळे येथे फुफाट्याचे लोट उठत आहेत. त्यामुळे समोरून येणारे वाहन दिसत नाहीत. परिणामी लहान-मोठे अपघात होत आहेत. कालच जि.प.चे माजी सदस्य प्रभाकर सोनवणे हे ह्या रस्त्याने जाताना त्यांच्या वाहनाला समोरून येणाऱ्या वाहनाने धडक दिल्याने त्यांच्या गाडीचे नुकसान झाले. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. या रस्त्यांवरून दिवस-रात्र हजारो वाहने वापरतात. वाहनचालक व पादचाऱ्यांना मरणयातना सहन कराव्या लागतात. दरम्यान, संबंधित विभागाने या कच्च्या रस्त्यावर पाणी, रेती, मुरूम टाकून रस्ता त्वरित पक्का करावा, अशी मागणीही माजी सरपंच जगन्नाथ बाविस्कर यांनी केली आहे.

# प्रथम सूर्यवंशी यांना 'महाराष्ट्र रत्न' राष्ट्रीय सेवाकार्य पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी । धरणगाव



**भुसावळ येथील अनुश्री महिला बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने संविधान दिनाचे औचित्य साधून देण्यात येणारा 'महाराष्ट्र रत्न' राष्ट्रीय सेवाकार्य-२०२५ पुरस्कार धरणगाव येथील करणी सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष तसेच स्वामी विवेकानंद वाचनालयाचे अध्यक्ष प्रथम भरत सूर्यवंशी यांना प्रदान करण्यात आला.**

या पुरस्कारासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून सामाजिक सेवेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अवघ्या २१ मान्यवरांची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये प्रथम सूर्यवंशी यांचा समावेश होता. भुसावळ येथे पार पडलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात अनुश्री महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा जयश्री इंगळे, राष्ट्रीय करणी सेनेचे अध्यक्ष दामोदर राजपूत, नोबेल इंग्लिश स्कूलच्या अध्यक्षा डॉ.अर्चना सूर्यवंशी, नगराध्यक्षा गायत्री भंगाळे तसेच देवयानी सूर्यवंशी यांच्याहस्ते हा पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. संविधान उद्देशिका प्रत, सन्मानचिन्ह, शाल, पुस्तके व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरुप होते.

प्रास्ताविक करताना जयश्री इंगळे यांनी प्रथम सूर्यवंशी यांनी शहर व परिसरात राबवलेल्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रमांसह विविध नवोपक्रमांची माहिती देत त्यांच्या विद्यार्थीहितैषी व उपक्रमशील कार्याचा गौरव केला.

पुरस्कार स्वीकारताना प्रथम सूर्यवंशी यांनी हा सन्मान माझी जबाबदारी अधिक वाढवणारा असून समाजातील उपेक्षित, वंचित व दुर्लक्षित घटकांसाठी अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मला मिळाली असल्याचे सांगितले. सूर्यवंशी यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर नातेवाईक, मित्रपरिवार तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### मामाचे मोहिदे येथे विकासकामांचे भूमिपूजन

प्रतिनिधी । शहादा

भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मामाचे मोहिदे येथे आ.राजेश पाडवी व पूज्य साने गुरुजी विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष दीपक पाटील यांच्याहस्ते विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत कार्यालयाची नूतन वास्तू, महामाया बुद्ध विहार, नवीन महावितरणचे सबस्टेशन, आदिवासी समाज मंदिर आदी कामांचे भूमिपूजन व लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रा.मकरंद पाटील, उपनगराध्यक्षा माधवी पाटील, माजी आरोग्य सभापती कांचन पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# पंकज ग्लोबल पब्लिक स्कूलला 'एनईपी-२०२० अंमलबजावणीतील अग्रणी' राष्ट्रीय पुरस्कार

प्रतिनिधी । चोपडा




**येथील पंकज ग्लोबल पब्लिक स्कूलला सीईडी फाउंडेशनतर्फे दिला जाणारा राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठेचा 'एनईपी-२०२० अंमलबजावणीतील अग्रणी' पंचतारांकित पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.**

नवी दिल्ली येथे आयोजित पुरस्कार वितरण समारंभात भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या एनआयओएसचे उपसंचालक आलोककुमार गुप्ता, नोएडा फिल्म सिटीचे संस्थापक डॉ.संदीप मारवा आणि प्रियदर्शी नायक यांच्याहस्ते पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या प्रतिनिधी दीपाली पंकज बोरोले व प्राचार्य मिलिंद पाटील यांनी हा मानाचा पुरस्कार स्वीकारला. देशभरातील सुमारे २९ हजार सीबीएसई शाळांमधून शेकडो शाळांची काटेकोर निवड प्रक्रिया पार पाडून पंकज ग्लोबल पब्लिक स्कूलची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी व काटेकोर अंमलबजावणी, विद्यार्थी केंद्रित शिक्षणपद्धती तसेच नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांमुळे शाळेने राष्ट्रीयस्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. शाळेत आधुनिक शिक्षणाची सांगड घालत कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित शिक्षण, अत्याधुनिक स्पेस व रोबोटिक लॅब यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि तांत्रिक कौशल्यांचा विकास करण्यात येत आहे. भविष्यातील शिक्षणाच्या गरजा ओळखून राबविण्यात येणारे हे उपक्रम एनईपी २०२० च्या उद्दिष्टांशी पूर्णतः सुसंगत आहेत.

शाळेच्या या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष डॉ.सुरेश पंडित बोरोले, संस्थेचे अध्यक्ष पंकज बोरोले, उपाध्यक्ष अविनाश राणे, संचालक नारायण बोरोले, गोकुळ भोळे, प्राचार्य मिलिंद पाटील तसेच संपूर्ण शिक्षकवृंदाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# स्वत:चा उद्योग उभारून ओळख निर्माण करा : समीर भाटीया

प्रतिनिधी । चोपडा



**युवकांनी स्वत:चा उद्योग उभारून ओळख निर्माण करावी, असे प्रतिपादन समीर भाटीया यांनी केले.**

महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ.सुरेश जी. पाटील महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२ ते ७ फेब्रुवारीदरम्यान आत्मनिर्भर युवती अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत आयोजित व्याख्यानाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ. के.एन.सोनवणे, विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ.संजय पाटील, उपप्राचार्य प्रा.डॉ. आर. एम. बागुल, उपप्राचार्य प्रा. डॉ. ए.बी.सूर्यवंशी, समन्वयक डॉ. एस.ए.वाघ उपस्थित होते.

पुढे बोलतांना समीर भाटीया यांनी, स्वयंरोजगार व युवतींसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली. यात त्यांनी स्व-व्यवसाय निर्माणासाठी विविध उत्कृष्ट आर्थिक सहाय्य योजना, त्यातील आर्थिक सहाय्य रक्कम, त्याची पात्रता तसेच या योजना ग्रामीण युवकांना कौशल्य प्रशिक्षण व नियमित रोजगार मिळवून देण्यासाठी कसे उपयुक्त आहे, याबाबत मार्गदर्शन केले.

त्यानंतर आयुर्वेदतज्ञ डॉ. वैशाली वैद्य यांनी, सुदृढ आरोग्यासाठी तरुणींची जीवन शैली कशी असावी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवतीसभा प्रमुख डॉ.प्रिती रावतोळे यांनी केले. तर सूत्रसंचलन व आभार डॉ. क्रांती क्षीरसागर यांनी केले. यशस्वीतेसाठी डॉ.डी. डी. कर्दपवार, डॉ.आर.आर. पवार, डॉ.के.एस.क्षीरसागर, सुनिता पाटील, डॉ.संगीता पाटील, रजनी जैस्वाल, हर्षा देवरे, पूजा पुन्नासे, आरती पाटील, धनंजय चौधरी, निलेश भाट, विशाल पाटील, रजिस्ट्रार डी.एम.पाटील, मुन्ना साळुंखे, व्ही.पी.हौसे, डॉ.सी.आर. देवरे, डॉ.डी.एस.पाटील, डॉ. अभिजित साळुंखे, रवी पाटील, सुधाकर बाविस्कर आदींचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. संदीप पाटील व सचिव डॉ. स्मिता पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी अभियानादरम्यान भेट देवून विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला.

## पान १ वरुन

### लाडक्या बहिणींचे पैसे.....

लाभार्थ्यांची माहिती अद्ययावत व पारदर्शक राहावी, यासाठी ई-केवायसी पडताळणी अनिवार्य केली आहे. याच अनुषंगाने जिल्हास्तरावरून तालुकास्तरावर लाभार्थी महिलांच्या याद्या रवाना करण्यात आल्या. मात्र, प्रत्यक्षात या पडताळणीचे काम कोण करणार, यावरच संभ्रम निर्माण झाला आहे.

दरम्यान, महिला व बाल विकास विभागामार्फत अंगणवाडी सेविकांवर अतिरिक्त कामाचा बोजा टाकण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. मानधन वाढ, कामाचा ताण, तांत्रिक अडचणी आणि मोबदल्याचा अभाव या कारणांमुळे ई-केवायसी पडताळणीचे काम करण्यास त्यांनी सपशेल नकार दिला आहे. परिणामी, अद्याप एकाही तालुक्यात प्रत्यक्ष पडताळणीची प्रक्रिया सुरू होऊ शकलेली नाही. या संदर्भात जळगाव येथील महिला व बाल विकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी हेमंत भदाणे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी लाभार्थी महिलांच्या याद्या तालुकास्तरावर पाठविण्यात आल्या आहेत, असे सांगितले. मात्र, ई-केवायसी पडताळणीची प्रक्रिया कुठपर्यंत पोहोचली आहे, याबाबत ठोस माहिती देणे त्यांनी टाळले. त्यामुळे त्यांच्या उत्तरातून प्रशासनातील गोंधळ स्पष्ट झाला.

### शासकीय आश्रमशाळेचे ......

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी व प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे आदी उपस्थित होते.

बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी अहिल्यानगर जिल्ह्याचा प्रारूप आराखडा सादर केला. बैठकीत बोलताना पालकमंत्री विखे यांनी आदिवासी पाड्यांवरील वीजपुरवठ्याची अडचण लक्षात घेता तेथे 'सोलार हायमास्ट' व सोलार स्ट्रीट लाईट बसविण्याची सुचना केली. आदिवासी भागातील पाणीपुरवठा योजना सुरळीत चालण्यासाठी 'सोलार पंप' बसविण्यावर भर द्यावा, तसेच आदिवासी क्षेत्रातील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहे बांधण्यात यावीत, असे त्यांनी सांगितले. अकोले तालुका हा निसर्गसंपन्न असून येथील पर्यटन विकासासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून वाढीव निधी उपलब्ध करून देण्याबाबतही त्यांनी यावेळी सूचित केले. आदिवासी विकास विभागाच्या कामाला गती देण्यासाठी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्र उपकार्यालय सुरू करण्याचे तसेच प्रकल्प अधिकारी (राजूर) यांनी आठवड्यातून किमान एक दिवस व आवश्यक कर्मचाऱ्यांनी या उपकार्यालयात उपस्थित राहून कामकाज पहावे, जेणेकरून जिल्ह्यातील अनुसूचित जमातीचे लाभार्थी, लोकप्रतिनिधी व इतर शासकीय यंत्रणांना संपर्क करणे सुलभ होईल. याबाबतची माहिती सर्वांपर्यंत पोहोचवावी, अशा सूचनाही पालकमंत्री विखे यांनी केल्या.

### अपंगांना मिळणार .....

जाते. या फिरत्या दुकानाची किमत ३ लाख ५० हजार रुपये इतकी आहे. या ई टेम्पोसाठी लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदान दिले जाते. वाहनातील अंतर्गत भागात व्यवसायाच्या दृष्टीने सर्व व्यवस्था केली जाते. मात्र मागील काही काळापासून या वाहनांसाठी निधी मिळत नसल्याने ही योजना बारगळली होती. मात्र यासाठी आता सरकारकडून २५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. हा निधी दिव्यांग कल्याण विभागाकडून वितरित केला जाणार असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाकडून काढण्यात आलेल्या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

### कुठेतरी काहीतरी गडबड .........

नाशिकमध्ये आयोजित शोक सभेदरम्यान बोलताना त्यांनी ही शंका उपस्थित केली.त्यानंतर या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होईल काय ती माहिती देखील समोर येईल परंतु सोन्यासारखी माणसं गेली ती परत कशी काय येईल? अशी खंत देखील यावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी बोलताना केली.

# नगरसेवकांनी विविध समस्यांवर नागरिकांशी साधला संवाद

प्रतिनिधी । धरणगाव




**नगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. ९ मध्ये नवनिर्वाचित नगरसेविका प्रियंका चेतन जाधव व नगरसेवक किशोर दौलत कंखरे यांनी प्रभागात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रभागातील विविध भागात भेट देत नळ पाणीपुरवठा, गटारींची दुर्दशा, रस्त्यांची अवस्था तसेच स्वच्छतेबाबत नागरिकांशी थेट संवाद साधत तक्रारी जाणून घेतल्या.**

पाहणीदरम्यान अनेक ठिकाणी उघड्या व तुंबलेल्या गटारी, साचलेले सांडपाणी, कचऱ्याचे ढिगारे, तुटलेले फरशी ब्लॉक दिसून आले. काही भागात गटारींमध्ये मोठ्याप्रमाणात घाण साचल्याने दुर्गंधी पसरली आहे. गटारीच्या बाजूला गवत दिसून आले. या समस्यांमुळे प्रभागातील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याची बाबही समोर आली. यावेळी नागरिकांनी पाणीपुरवठ्यातील अनियमितता, गटारी साफसफाईचा अभाव, रस्त्यांवरील खड्डे व रस्त्याची दुरवस्था अशा समस्या मांडल्या. यावेळी प्रियंका जाधव व किशोर कंखरे यांनी सर्व तक्रारींची नोंद घेऊन संबंधित विभागांशी तात्काळ संपर्क साधून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. नगरसेविका प्रियंका जाधव यांनी सांगितले की, प्रभागातील मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्याला आमचे प्राधान्य आहे. नागरिकांच्या समस्या थेट जागेवर जाऊन समजून घेत आहोत. गटार स्वच्छता, पाणीपुरवठा व रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत लवकरच ठोस उपाययोजना करण्यात येतील. तर नगरसेवक किशोर कंखरे यांनीही स्वच्छता मोहीम राबवून गटारी साफ करण्याबरोबरच खराब झालेल्या फरशी व रस्त्यांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव नगरपालिकेकडे सादर करण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी अशोक भदाणे, जगदीश शिंदे, रमेश ओस्तवाल, अतुल भाटिया, जगदीश भोई, नागराज पाटील, व्ही.एच. चौधरी, पप्पू कंखरे, किरण महाजन, मोनू चौधरी, गोपाल चव्हाण, चेतन जाधव आदींसह प्रभागातील नागरिक उपस्थित होते. या पाहणी आणि भेटीमुळे प्रभागातील नागरिकांमध्ये सकारात्मक अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. लवकरच समस्या मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अरुण पगारे यांचे निधन



**घोडगाव, ता चोपडा ।** निजामपूर (ता.साक्री) येथील रहिवासी अरुण बुवाजी पगारे (वय-६५) यांचे दि.२ फेब्रुवारी रोजी हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं, आई, तीन भाऊ, पाच बहिणी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते सूतगिरणीचे माजी संचालक प्रकाश पंडितराव रजाळे यांचे मेहुणे तर अमित व रोहित पगारे यांचे वडील तर बाजीराव पगारे ऊर्फ पिंटुभाऊ पगारे यांचे मोठे भाऊ होतं.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### प्राचार्य डॉ.आर.के. नारखेडेंनी घेतला पदभार



**जळगाव ।** येथील डॉ. अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ.आर.के. नारखेडे यांची नियुक्ती करण्यात आली असून नूतन प्राचार्य म्हणून नुकतेच रुजू झाले. प्रभारी प्राचार्य डॉ. व्हि. जे. पाटील यांच्याकडून डॉ. नारखेडे यांनी प्राचार्य पदाचा पदभार स्वीकारला.पदभार स्वीकारल्यावर डॉ.नारखेडे यांनी महाविद्यालयाचा चढता आलेख उंचावण्याचा निर्धार केला. डॉ. नारखेडे यांनी पर्यावरण शास्त्राचे प्राध्यापक म्हणून मु. जे. महाविद्यालय व महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय (उदगीर) येथे सेवा दिली आहे. त्यांना पदवी व पदव्युत्तर स्तरावरील २९ वर्षाचा प्रदीर्घ असा अध्यापन व संशोधनाचा अनुभव आहे. डॉ. नारखेडे हे जळगाव, नांदेड व सोलापूर येथील विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र या अभ्यास मंडळाचे सदस्य देखील आहेत.

### विद्यापीठात १२ रोजी रोजगार मेळावा

**जळगाव ।** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार, दि.१२ रोजी सकाळी १० वाजता रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा विद्यापीठातील पदवी प्रदान सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. या रोजगार मेळाव्यासाठी जिल्ह्यातील विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील सर्व पदवीधर, या पूर्वी उत्तीर्ण झालेले, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात अंतिम वर्षात असलेल्या विहित पात्रता धारक विद्यार्थ्यांनी या रोजगार मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना बुधवार, दि.११ पर्यंत नोंदणी करता येणार आहे.

# मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना शेतकऱ्यांसाठी वरदान : ना.गुलाबराव पाटील

प्रतिनिधी । जळगाव



**राज्यातील शेतकऱ्यांना शेतापर्यंत बारमाही, मजबूत व दर्जेदार रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेली मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना ही शेती उत्पादन खर्च कमी करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणारी असून ही योजना निश्चितच शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना शेतापर्यंत बारमाही कनेक्टिव्हिटी मिळेल, शेतमाल वेळेवर बाजारात पोहोचेल, शेती खर्च कमी होईल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.**

जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या योजनेची जिल्हास्तरीय समिती बैठक पार पडली. बैठकीला जि.प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, उपजिल्हाधिकारी मंजुषा घाडगे, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे, कार्यकारी अभियंता एस.बी. पाटील, उपविभागीय अधिकारी मयूर भंगाळे, कार्यकारी अभियंता संजय राठोड यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलतांना ना.पाटील म्हणाले की, शेतातील कामे व शेतमाल वाहतुकीसाठी शेतरस्ते अत्यावश्यक असून अनेक ठिकाणी त्यांच्या अभावामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे मजबूत व बारमाही शेत, पाणंद रस्ते आवश्यक असल्याने ही योजना सुरू करण्यात आली असल्याचे सांगून या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील सरपंच, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांसोबत तातडीने बैठका घेण्याचे आदेश त्यांनी दिले.

**■ गुणवत्तेवर विशेष भर देणार : जिल्हाधिकारी**

यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा प्रशासनामार्फत सर्व विभागांमध्ये समन्वय ठेवण्यात येईल. प्रस्ताव, मान्यता, निविदा व प्रत्यक्ष काम या सर्व टप्प्यांवर वेळबद्धता आणि गुणवत्ता यावर विशेष भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## दुचाकी लांबवणाऱ्या दोघांवर एमआयडीसी पोलिसांची कारवाई



प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील काशिनाथ चौक भागातून दुचाकी लांबवणाऱ्या दोघांवर एमआयडीसी पोलिसांनी कारवाई केली. त्यांच्याकडून चोरी केलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे.**

आतिष जितेंद्र पोथीवाल (रा. कांचननगर, जळगाव) आणि गणेश लक्ष्मण कोळी (रा.साकेगाव, ता.भुसावळ) असे अटक करण्यात आलेल्या संशयीतांची नावे आहेत. त्यांच्याकडून चोरी करण्यात आलेली दुचाकी (एम.एच.१९, ए.के. ०२०७) जप्त करण्यात आली आहे. एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक राहुल तायडे, चंद्रकांत धनके, पोलीस हवालदार प्रमोद लाडवंजारी, गिरीश पाटील, पोलीस कॉन्स्टेबल गणेश ठाकरे, राहुल घेटे, योगेश घुगे आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

दरम्यान, दोघा संशयीतांना अटक करुन न्यायालयात हजर केले असता त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

## सत्यम पार्कमध्ये घरफोडी; दोन चांदीच्या अंगठ्यांसह १० हजाराची रोकड लंपास

प्रतिनिधी । जळगाव





**शहरातील सत्यम पार्कमध्ये बंद घर फोडून दोन चांदीच्या अंगठ्यांसह १० हजारांची रोकड लांबविण्यात आल्याची घटना मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणी जळगाव तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी होत आहे.**

राजेश प्रदिप सोनवणे (रा. सत्यम पार्क, जळगाव) हे पत्नीसह वास्तव्यास असून ते शहरातील एका खाजगी कंपनीत सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत आहेत. सोनवणे हे मंगळवारी रात्रपाळीला ड्युटीवर गेले होते तर त्यांच्या पत्नी या भोईटेनगर येथील मोठ्या बहिणीकडे गेल्या होत्या. त्यामुळे घर बंद होते. घर बंद असल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी घराचा कडीकोयंडा तोडून कपाटातील दोन चांदीच्या अंगठ्या व १० हजार रुपये रोख असा ऐवज चोरुन नेला.

सोनवणे हे ड्युटी आटोपून बुधवारी पहाटे ६ वाजेच्या सुमारास घरी आल्यानंतर त्यांना घराचा दरवाजा उघडा दिसला. त्यांनी घरात जावून पाहिल्यावर त्यांना घरातील तसेच कपाटातील सर्व सामान अस्ताव्यस्त असल्याचे दिसून आल्यानंतर त्यांना घरात चोरी झाल्याचे समजले. त्यानंतर त्यांनी सुरुवातीला ११२ या क्रमांकावर व त्यानंतर तालुका पोलीस स्टेशन गाठत चोरीच्या घटनेची माहिती दिली. याप्रकरणी राजेश सोनवणे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुध्द जळगाव तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**गस्त वाढवण्याची मागणी**

शहरात घरफोडी, चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झालेली असून या भागात पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## मू.जे. त डेटा विश्लेषण कार्यशाळेचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

येथील मूळजी जेठा महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने संशोधन लेखन व एस.पी.एस.एस. आधारित डेटा विश्लेषण या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन समन्वयक प्रोफेसर केतन नारखेडे यांच्याहस्ते करण्यात आले.

यावेळी बोलतांना त्यांनी, प्राणीशास्त्र विभाग हा केवळ अध्यापनापुरता मर्यादित न राहता नवनवीन कल्पना, उपक्रम आणि संशोधनाच्या माध्यमातून सतत कार्यरत असतो, अशा शब्दात कौतुक केले. यावेळी माजी विभाप्रमुख डॉ. रघुनाथ महाजन, डॉ.नयन माहेश्वरी, हेमंत झोपे उपस्थित होते. या मान्यवरांनी विभागासाठी १५०००० रुपये किमतीची पुस्तके भेट दिली. त्याबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ व गुलाबाचे रोप देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या उपक्रमामुळे विभागाच्या ग्रंथसंपदेत भर पडण्यास मदत झाली असून विद्यार्थ्यांच्या अध्ययन व संशोधन कार्याला चालना मिळणार आहे. तीन सत्रांमध्ये ही कार्यशाळा पार पडली.

## विरोधी पक्षनेतेपद सत्ताधाऱ्यांकडेच जाण्याची शक्यता

• शिवसेना (उबाठा)वर 'महायुती'कडून गेल्या वेळचा पॅटर्न उलटविण्याचा डाव

प्रतिनिधी । जळगाव



**जळगाव महानगरपालिकेत महायुतीकडे स्पष्ट बहुमत असल्याने सत्ता सत्ताधाऱ्यांकडेच राहणार आहे. मात्र, विरोधी पक्षनेतेपद कोणाकडे जाणार, यावरून सध्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू आहे. गेल्या महापालिका कार्यकाळात शिवसेना (उबाठा)ने वापरलेला राजकीय पॅटर्न यावेळी महायुतीकडूनच उलटविला जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे.**

महापालिकेच्या ७५ जागांपैकी भारतीय जनता पक्षाला ४६ जागा मिळाल्या असून भाजप स्वतंत्रपणे सत्ताधारी ठरतो. शिवसेना (शिंदे गट)कडे २२ जागा असून एका अपक्ष नगरसेवकाचा पाठिंबा मिळाल्याने त्यांची सदस्यसंख्या २३ झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)ला एक जागा मिळाली आहे. तर विरोधी शिवसेना (उबाठा) गटाला केवळ ५ जागा मिळाल्या आहेत. महायुतीतील भाजप- शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी महापालिकेत स्वतंत्र गटनिहाय नोंदणी केली आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या हे गट वेगळे मानले जातात.

नियमानुसार, सत्ताधारी गटानंतर सर्वाधिक सदस्यसंख्या असलेल्या गटाला विरोधी पक्षाचा दर्जा व विरोधी पक्षनेतेपद मिळू शकते. या पार्श्वभूमीवर, भाजपनंतर दुसऱ्या क्रमांकाची सदस्यसंख्या असलेल्या शिवसेना (शिंदे गट)कडेच विरोधी पक्षनेतेपद जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे प्रत्यक्ष विरोधी बाकावर बसलेल्या शिवसेना (उबाठा) गटाला विरोधी पक्षनेतेपदापासून वंचित राहावे लागू शकते. विशेष म्हणजे, मागील कार्यकाळात शिवसेना (उबाठा)कडे महापौरपद असतानाही भाजपला विरोधी पक्षनेतेपद न देता शिवसेना (शिंदे गट)नेच ते पद स्वतःकडे ठेवले होते. तोच राजकीय डाव यावेळी महायुतीकडून शिवसेना (उबाठा)वर उलटविला जाण्याची चिन्हे दिसत आहेत.

विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय आगामी महापालिका सभांमध्ये स्पष्ट होणार असून, या निर्णयाकडे शहरातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## संत ज्ञानेश्वर विद्यालयात तानाजी चित्रपटाचे प्रदर्शन

प्रतिनिधी । जळगाव




**संत ज्ञानेश्वर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात वीर तानाजी मालुसरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यार्थ्यांना 'तानाजी' हा प्रेरणादायी व ऐतिहासिक चित्रपट दाखविण्यात आला.**

कार्यक्रमाच्या प्रारंभी तानाजी मालुसरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षकांनी तानाजींच्या शौर्यगाथेचा संक्षिप्त आढावा घेत विद्यार्थ्यांना स्वराज्य, देशभक्ती आणि त्याग यांचे महत्त्व पटवून दिले. चित्रपटातून विद्यार्थ्यांना इतिहासाची ओळख तर झालीच, पण त्याचबरोबर राष्ट्रप्रेम, धैर्य आणि कर्तव्यनिष्ठा यांचे प्रेरणादायी संदेशही मिळाले. मुख्याध्यापक मुकेश नाईक यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, अशा ऐतिहासिक चित्रपटांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना दृढ होते आणि आपल्या इतिहासाबद्दल अभिमान निर्माण होतो. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक निलेश पवार यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## अनुभूती स्कूलमध्ये २ दिवसीय विज्ञान प्रदर्शनचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

ANUBHŪTI SCHOOL

**येथील अनुभूती निवासी शाळेत दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून शुक्रवार, दि.६ रोजी सकाळी शाळेच्या असेंब्ली हॉलमध्ये जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेडचे सहव्यवस्थापकीय संचालक अजित जैन यांच्याहस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे.**

यावेळी शाळेचे अध्यक्ष अतुल जैन, संचालिका निशा जैन आणि प्राचार्य देबासिस दास उपस्थित राहणार आहेत. या प्रदर्शनात इयत्ता ५ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले ५० हून अधिक नाविन्यपूर्ण प्रकल्प पाहायला मिळणार आहेत. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, जैवतंत्रज्ञान, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, खगोलशास्त्र आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञान अशा विविध शाखांतील प्रकल्पांचा यात समावेश असून, हे प्रकल्प केवळ सैद्धांतिक ज्ञानापुरते मर्यादित नसून दैनंदिन जीवनातील आव्हानांना विज्ञानाच्या माध्यमातून उपाय शोधण्यावर आधारित आहेत. पर्यावरण संरक्षण, ऊर्जा बचत, स्मार्ट तंत्रज्ञान आणि शेतीतील आधुनिक उपाययोजना यांसारख्या विषयांवर विद्यार्थी कल्पकतेने आपले मॉडेल्स सादर करणार आहेत. विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोन रुजविण्यासाठी दरवर्षी असे प्रदर्शन भरविले जाते. शाळेच्या विज्ञान शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी प्रकल्पांची निर्मिती केली आहे. स्कूलचे संस्थापक श्रद्धेय मोठेभाऊ अर्थात भवरलालजी जैन यांनी अनुभवावर आधारीत शिक्षणाची संकल्पना अवलंबली आहे. सायन्स प्रदर्शनासारखे विविध उपक्रम त्यांच्याच प्रेरणेतून राबविले जात आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा, सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न यातून होत आहे. प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी इंटर-स्कूल विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून विविध शाळांतील विद्यार्थी यात सहभागी होणार आहेत. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक विचारसरणी, टीमवर्क आणि निरोगी शैक्षणिक स्पर्धेला चालना देणे हा आहे. दुसऱ्या दिवशी नामवंत वैज्ञानिक आणि विषयतज्ज्ञ विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना मार्गदर्शन करतील. शनिवार, दि. ७ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत शाळेच्या माध्यमातून नोंदणी करून विद्यार्थ्यांना हे प्रदर्शन पाहण्याची सोय केली आहे. पालक, शिक्षक, विद्यार्थी आणि विज्ञानप्रेमी यांनी या प्रदर्शनाला भेट देण्यासाठी आधी स्नेहल जोशी यांच्याशी ०२५७-२२६४६०० या दूरध्वनीवर संपर्क साधावा व अग्रीम नोंदणी करावी, असे आवाहन शाळेतर्फे करण्यात आले आहे.

# चिमुकल्यांनी नृत्यातून घडवले कला, संगीत, संस्कृतीचे दर्शन

• पोदार प्रेपमध्ये रंगला 'जंबो के साथ सुर और साज का संगम'; चिमुकल्यांच्या नृत्यांनी भारावले पालक

प्रतिनिधी । जळगाव





**येथील पोदार प्रेपमध्ये 'जंबो के साथ सुर और साज का संगम' हे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. यात विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र, गुजराथ, गोवा, छत्तीसगड, पश्चिम बंगाल यासह देशभरातील विविध राज्यांचा पेहराव करुन त्या-त्या राज्यातील गाण्यावर नृत्य सादर करत कला, संगीत आणि संस्कृतीचे दर्शन घडविले. चिमुकल्यांनी सादर केलेल्या बहारदार नृत्यांनी पालक चांगलेच भारावले.**

स्नेहसंमेलनास प्रमुख पाहुणे डॉ.नितल देशमुख, मुख्याध्यापक गोकुळ महाजन, उपमुख्याध्यापक दीपक भावसार, ज्येष्ठ मुख्याध्यापिका उमा पाटील, प्रशासकीय अधिकारी जितेंद्र कापडे, सागर देशमुख उपस्थित होते. मान्यवरांच्याहस्ते दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी मुख्याध्यापक गोकुळ महाजन यांनी मनोगत व्यक्त करतांना, 'जंबो के साथ सुर और साज का संगम' ही केवळ एक संगीतमय मेजवानी नसून भारतातील विविध राज्यांतील पारंपरिक वाद्यांच्या समृद्ध वारशाला अर्पण केलेली आदरांजली आहे. या अनोख्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी भारतभरातील सुर (स्वर) आणि साज (वाद्ये) यांचा अनुभव घेत एक संगीतमय प्रवास केला. भारतातील पारंपरिक वाद्यांची ओळख होत असताना विद्यार्थ्यांना आपल्या देशाच्या सांस्कृतिक वारशाशी आनंददायी व प्रत्यक्ष अनुभवातून जोडले गेले. वाद्यांशी संवाद साधताना विद्यार्थ्यांमध्ये ताल, ध्वनी आणि समन्वयाची समज विकसित झाली तसेच विविध राज्यांच्या कला व संस्कृतीबद्दल आदरभाव निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ.नितल देशमुख यांनी देखील मनोगत व्यक्त केले.

त्यानंतर सीनिअर केजी ए च्या विद्यार्थ्यांनी गुजराथ, आंध्रप्रदेश, सीनिअर केजी बी च्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र, गोवा आणि तामिळनाडू, ज्युनिअर केजी ए च्या विद्यार्थ्यांनी दादरा, नगर हवेली, पंजाब, उत्तरप्रदेश, नर्सरी ए च्या विद्यार्थ्यांनी छत्तीसगड, बिहार, पश्चिम बंगालच्या गाण्यांवर तर मध्यप्रदेश आणि कर्नाटकच्या गाण्यांवर नृत्य सादर करत तेथील कला, संगीत, वेशभुषा आणि संस्कृतीचे दर्शन घडविले. चिमुकल्यांनी सादर केलेल्या आपल्या कलाविष्काराने शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, प्रमुख मान्यवरांसह पालकांची मने जिंकली. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि सर्वांगीण विकास अधोरेखित झाल्याचे पहायला मिळाले.

## श्री गजानन महाराज प्रगट दिन महोत्सवाचे आयोजन



प्रतिनिधी । जळगाव

**येथील कल्याणी नगरातील श्री गजानन महाराज भक्त परिवारच्यावतीने रविवार, दि.८ रोजी श्री गजानन महाराज प्रगट दिन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.**

महोत्सवात दि.८ रोजी पहाटे श्री गजानन महाराजांच्या उत्सव मूर्तीस व पादुकांना महाभिषेक, त्यानंतर सकाळी ८ ते १२ वाजेदरम्यान पालखी परिक्रमा, दुपारी १२ वाजेला महाराजांची महाआरती होऊन १२.३० वाजेपासून महाप्रसाद वितरण आदी कार्यक्रम होणार आहेत. त्यानंतर संध्याकाळी ८ वाजता सुंदरकांड व भजनसंध्याने या महोत्सवाची सांगता होणार आहे. सर्व भाविक भक्तांनी या महोत्सवामध्ये जास्तीत-जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री गजानन महाराज भक्त परिवारचे अध्यक्ष अखिलेश कुलकर्णी यांनी केले आहे.

# आजार होण्याआधी योग करा, निरोगी आयुष्य घडवा

## 'ऊर्जा व आत्मविश्वासाचा स्त्रोत' याविषयावर व्याख्यान प्रसंगी डॉ.स्मिता पाटील यांचा सल्ला

प्रतिनिधी । चोपडा

**बहुतेक वेळा आजार झाला की आपण डॉक्टरांकडे धाव घेतो. म्हणून आजार होण्याआधी योग करा, निरोगी आयुष्य घडवा, असा मंत्र येथील दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयाच्या सचिव डॉ. स्मिता पाटील यांनी विद्यार्थिनींना दिला. 'आत्मनिर्भर युवती अभियानांतर्गत आयोजित व्याख्यानाप्रसंगी त्या बोलत होत्या.**

येथील दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभाग व कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी दि.२ ते ७ फेब्रुवारीदरम्यान आत्मनिर्भर युवती अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अॅड.संदीप सुरेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. दि. ३ रोजी तरुणीसाठी योग : ऊर्जा आणि आत्मविश्वासाचा स्त्रोत याविषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा गांधी शिक्षण मंडळाच्या सचिव डॉ. स्मिता पाटील ह्या उपस्थित होत्या. यावेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना सचिव डॉ. स्मिता पाटील म्हणाल्या की, आरोग्य हीच खरी संपत्ती आहे.त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करायला नको, आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण काम, जबाबदाऱ्या आणि ताणतणाव यामध्ये इतके गुंतून गेलो आहोत की, स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्यायला वेळच उरत नाही. बहुतेक वेळा आजार झाला की आपण डॉक्टरांकडे धाव घेतो. आजार होण्याआधी योग करा, निरोगी आयुष्य घडवा, असा मंत्र याप्रसंगी त्यांनी दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार डॉ. क्रांती क्षीरसागर यांनी मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युवती सभा प्रमुख डॉ. प्रिती रावतोळे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. डी. डी. कर्दपवार, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. आर आर पवार, समिती सदस्य डॉ.के. एस. क्षीरसागर, सुनिता पाटील, डॉ. संगीता पाटील, रजनी जैस्वाल, हर्षा देवरे, पूजा पुन्नासे, आरती पाटील, धनंजय चौधरी, निलेश भाट, विशाल पाटील यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास रजिस्ट्रार डी. एम. पाटील, व्ही.पी.हौसे, डॉ. सी.आर.देवरे, डॉ. डी.एस. पाटील, डॉ.अभिजित साळुंखे,रवी पाटील, सुधाकर बाविस्कर यांचे सहकार्य लाभले.




# मालगाडीच्या धडकेत वरणगावचा तरुण ठार

प्रतिनिधी । भुसावळ

**तालुकक्यातील वरणगाव रेल्वे स्टेशन परिसरात मध्यरात्री १.३० वाजेच्या सुमारास घडलेल्या हृदयद्रावक घटनेत सागर (वैभव) दिलीप कोळी (वय २५, रा. कोळीवाडा, वरणगाव) या तरुणाचा मालवाहू रेल्वेच्या धडकेत जागीच मृत्यू झाला. याबाबत रेल्वे लोहमार्ग पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.**



सागर कोळी हा मंगळवारी रात्री सुमारे १.३० वाजेच्या सुमारास वरणगाव रेल्वे स्टेशन परिसरात आला होता. त्याचवेळी भुसावळकडून येणाऱ्या मालवाहू रेल्वेने दादरा परिसराच्या काही अंतरावर त्याला जोरदार धडक दिली. या अपघातात सागरचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच भुसावळ-लोहमार्ग रेल्वे पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी भुसावळ पाठवण्यात आला. या प्रकरणी अशोक पुंडलीक कोळी (रा.वरणगाव) यांचे खबरीवरून भुसावळ लोहमार्ग पोलिसात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे कोळी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. यापूर्वी सागरच्या भावाचाही रेल्वे अपघातात मृत्यू झाला होता.

## थोडक्यात

### नगरदेवळा येथे आज माझी मुलगी माझा अभिमान कार्यक्रम

**नगरदेवळा ।** येथील एस.के. पवार विद्यालयात पाचोरा पोलिस स्टेशन व नगरदेवळा पोलिस दूरक्षेत्राच्या संयुक्त विद्यमाने युवक-युवती, पालकांसाठी प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन स्त्री सशक्तीकरण, सामाजिक जाणीव आणि कौटुंबिक मूल्यांचा जागर घडविणाऱ्या 'माझी मुलगी, माझा अभिमान' या उपक्रमाचे आयोजन उद्या गुरुवार, दि. ५ रोजी सकाळी ९ ते ११ करण्यात आले आहे. समाजात सकारात्मक बदल घडविण्याचा ठाम उद्देश या उपक्रमामागे आहे. कार्यक्रमात महाराष्ट्राचा फायर ब्रँड म्हणून ओळखले जाणारे, तरुणांचे लाडके वक्ते, युवक व्याख्याते व प्रेरणादायी समाज परिवर्तनकार प्रा.वसंत हंकारे (छत्रपती संभाजीनगर) यांचे प्रभावी व्याख्यान होणार आहे. आई वडील, मुलगा, मुलगी यांच्यातील नातेसंबंध, मुलींचे महत्त्व, पालकांची जबाबदारी आणि आजच्या बदलत्या सामाजिक वास्तवात मूल्यसंस्कारांचे महत्त्व या विषयांवर ते ज्वलंत शब्दांत मार्गदर्शन करणार आहेत.

# गणपूर येथे सर्वपक्षीयांतर्फे अजित पवार यांना श्रद्धांजली



प्रतिनिधी । चोपडा

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नुकतेच विमान अपघाताने निधन झाले. त्यांना गणपूर (ता. चोपडा ) येथे सर्वपक्षीय नेते व कार्यकर्त्यांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी गणपूरसह परिसरातील पदाधिकारी , कार्यकर्ते श्रद्धांजली सभेला मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

गणपूर येथील ग्रामपंचायत चौकात झालेल्या कार्यक्रमात अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुणभाई गुजराथी, माजी आमदार प्रा.दिलीपराव सोनवणे, शांताराम पाटील, यांनी अभिवादन केले. यावेळी तालुकास्तरावरील विविध पक्षांचे व संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सुनील पाटील, कांतीलाल पाटील, शांताराम पाटील, संजीव सोनवणे, माजी आ. दिलीपराव सोनवणे यांनी अजित पवार यांच्या कार्यकाळाविषयी आपले विचार मांडले. या श्रद्धांजलीपर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अॅड.बाळकृष्ण पाटील यांनी केले. डॉ.अजय करंदीकर व बाळकृष्ण दीक्षित यांनी पसायदान व मंत्रोपचारानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी भरत पाटील,बाळासाहेब पाटील,भरत बाविस्कर,अॅड एस.डी. सोनवणे, शशिकांत देवरे, डी.पी.साळुंखे, नरेंद्र पाटील, प्रमोद पाटील, शशिकांत पाटील, नारायण पाटील, संभाजी पाटील, गोपाल महाजन, नीता पाटील, ए.के. गंभीर व तालुकास्तरीय विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हर्षल पाटील, नरेंद्र कोळी आदींनी परिश्रम घेतले.

# सीसीआय केंद्रावरील आर्थिक लूट थांबवण्याची मागणी

प्रतिनिधी । अमळनेर

**येथील लामा जिनिंग येथे सुरू असलेल्या सीसीआय केंद्रावर शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोप करत येथील शेतकऱ्यांनी प्रांताधिकारी व तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांना निवेदन दिले आहे.**

गेल्या ७ ते ८ वर्षांपासून अमळनेर येथे सीसीआय केंद्र बंद होते. नुकतेच केंद्र सुरू झाल्यानंतर उद्घाटनाच्या दिवशी कापसाचे मोजमाप सुरळीत झाले. मात्र दुसऱ्याच दिवसापासून शेतकऱ्यांच्या कापसात कवडी, कचरा अथवा आर्द्रता जास्त असल्याची कारणे सांगून प्रतिक्विंटल ५ ते ६ किलो वजन कपात केली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. मोजमापाच्या नावाखाली प्रतिक्विंटल २० रुपये रोख रक्कम घेतली जात असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार वजन कपात करताना वाहनाचे वजन मोजताना कमी केलेले वजन त्यात समाविष्ट केल्याने काटापट्टीमध्ये प्रत्यक्ष कपात झालेली दिसून येत नाही. शेतकऱ्यांनी आवाज उठवल्यास केंद्र बंद करण्याची तसेच तालुका ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्याची धमकी दिली जाते. याशिवाय, दुसऱ्या जिनींगमध्ये सीसीआय केंद्र सुरू करण्याची मागणी केल्यास आश्वासन दिले जाते. मात्र प्रत्यक्षात दुसरे केंद्र सुरू केले जात नसल्याचे शेतकऱ्यांनी नमूद केले आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून प्रांताधिकारी व तहसीलदारांनी स्वतः लक्ष घालून सीसीआय केंद्रावरील लूट थांबवावी, अशी मागणी केली आहे.

# दोडे गुजराऊ बोलीने मराठीच्या मूलभूत चौकटीत राहूनही स्वतंत्र स्वरूप टिकवून ठेवलंय : खेडीभोकरीकर

प्रतिनिधी । चोपडा






## मराठी भाषा पंधरवडानिमित्त

**दोडे गुजराऊ बोलीने मराठीच्या मूलभूत चौकटीत राहूनही स्वतंत्र स्वरूप टिकवून ठेवलंय, असे प्रतिपादन विलास खेडीभोकरीकर यांनी केले. धुळे जिल्ह्यातील का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था व मराठी भाषा विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बोलींचा जागर कार्यक्रमात ते बोलत होते.**

मराठी भाषा पंधरवडानिमित्त अहिराणी व गुर्जर बोली या बोली भाषांचा जागर करण्यात आला. यात गुर्जर बोली भाषा अभ्यासक म्हणून बोलतांना गुर्जर बोलीची उपबोली दोडे गुजराऊ बोली संदर्भात विलास खेडीभोकरीकर यांनी पुढे बोलताना सांगितले की, विविध प्रदेशातील बोली - उपबोली मराठी भाषेच्या मूळ प्रवाहाला अनेक स्तरांवर समृद्ध करताना दिसतात. यात खान्देश परिसरातील गुर्जर समाजाच्या ४-५ पोटजाती व त्यांच्या गुजराऊ बोली त्यांच्या पोट बोली या मराठी भाषेच्या विशाल वृक्षाच्या डहाळ्या आहेत. त्यातील दोडे गुजराऊ बोली ही एक वैशिष्ट्यपूर्ण डहाळी आहे. या पोट बोलीने मराठी भाषेच्या मूलभूत चौकटीत राहूनही आपले स्वतंत्र व्याकरणीक, शब्दरूपात्मक लहेजासह आपले स्वरूप टिकवून ठेवले आहे. गुजराऊ बोलीचा उगम हा प्रामुख्याने गुर्जर समाजाच्या स्थलांतराशी निगडीत असल्याने राजस्थानी, गुजराथी, खान्देशी भाषिक प्रवाहांच्या संपर्कातून गुजराऊ बोलीचा विकास झाला असला तरी दोडे गुजराऊ बोलीची संरचना मुख्यत्वे मराठी भाषा कुळातच बसते. मौखिक परंपरा, सण, मंगल सोहळे यातील गाणी, लोकगीतं, लोककथा, म्हणी-वाक्प्रचारांमधून ही दोडे गुजराऊ बोली पिढ्यान पिढ्या जतन होत आली आहे, असेही भोकरीकर यांनी सांगितले.या बोलींचा जागर कार्यक्रमावेळी अहिराणी बोलीवर प्रा.डॉ. फुला बागुल, रमेश सूर्यवंशी यांनी तसेच गुर्जर बोलीवर प्रा.डॉ.सुधाकर चौधरी यांनी आपले विचार मांडले तसेच भाषा संचालनालयाचे ह .म . सूर्यवंशी, संदीप साबळे, नामदेव कोळी तसेच धुळे का .स .वाणी मराठी प्रगत अध्ययन केंद्राचे अध्यक्ष शशिकांत धामणे, सचिव डॉ.शोभा शिंदे, विश्वस्त डॉ .वंदना महाजन यांनी ही आपले विचार व्यक्त केले.

# गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाच्या जळगाव तालुकाध्यक्षपदी सुमित पाटील



प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील पद्ममालय विश्रामगृह जळगाव येथे गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाची बैठक नुकतीच केंद्रीय अध्यक्ष नरेंद्र कदम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय उपाध्यक्ष रवींद्र पवार केंद्रीय महासचिव भगवान सोनार, केंद्रीय कार्याध्यक्ष सागर ओतारी, केंद्रीय खजिनदार ललित खरे, सदस्य गणेश पाटील, जोशीला पगारीया तसेच ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत यादव, डॉ दिलीप तिवारी व राजेश यावलकर यांच्यासह नवनियुक्त केंद्रीय कार्यकारिणी पदाधिकारी उपस्थित होते.**

यावेळी जळगाव तालुका गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघटनेचे नवनियुक्त जळगाव तालुका अध्यक्ष सुमीत पाटील व उपाध्यक्ष प्रविण पाटील यांच्या नावाची घोषणा करून त्यांना मान्यवरांच्याहस्ते नियुक्तीपत्र देवून गौरव करण्यात आला.

# भुसावळ नगरपालिकेच्या पहिल्याच सभेत गदारोळ

## अनेक विषयांना मिळाली मंजुरी : काहीवेळ तणावाचे वातावरण

प्रतिनिधी । भुसावळ

**नगरपालिकेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत गदारोळ झाला असून अनेक विषय मंजूर झाले. तर काही विषयांवर प्रदीर्घ चर्चा आणि विरोध झाला. सभेदरम्यान प्रभाग क्रमांक २ मधील पाणीपुरवठा योजनेशी संबंधित पाईपलाईन टाकण्याच्या विषयावरून विशेषतः वाद निर्माण झाला. ज्यामुळे सभागृहात काहीवेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.**



यावेळी ज्येष्ठ नगरसेवक संतोष चौधरी यांनी मध्यस्थी केल्यानंतर सर्व प्रकरण शांत झाले. विषय क्र.१ मधील कब्रस्तानला लाकडे व गौऱ्या पुरवण्यासंदर्भात मंजुरी देण्याच्या आधीच भाजपचे गटनेते युवराज लोणारी यांनी लक्षवेधी सूचना मांडत या विषयावर यापूर्वी लेखापरीक्षकांनी आक्षेप नोंदवलेले आहे. त्यामुळे हा विषय काळजीपूर्वक मंजूर करावा, अशी सूचना केली. विषय क्रमांक २२ नुसार उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण होऊ नये, यासाठी नदीपात्रातून पाणबुडीद्वारे पाणी उचल करून जॅकवेलमध्ये घेणेकरीता मंजुरी प्रदान करण्याबाबतचा विषय पटलावर ठेवण्यात आल्यानंतर पाणबुडी या व्याख्येबाबत अधिकारी समाधानकारक माहिती देऊ शकले नाही. त्यामुळे सर्वच नगरसेवकांनी याबाबत नाराजी दर्शविली. पाणबुडी म्हणजे प्रशासकीय भाषेत नेमके काय? याचे कोणतेही उत्तर देण्यास अधिकारी असमर्थ ठरले. नदीपात्रातून पाणीबुडीद्वारे पाणी उचलत करून जॅकवेलमध्ये घेणे हा मुद्दा महत्त्वाचा ठरला. सभेत प्रभाग क्रमांक २ साठी तब्बल ४२ वेगवेगळे विषय मंजुरीसाठी ठेवल्यावरून भाजपचे गटनेते युवराज लोणारी यांनी एकाच प्रभागासाठी इतके विषय मांडल्याने 'लाडका नगरसेवक' योजना राबवली जात आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. याला नगरसेवक सचिन चौधरी यांनी युवराज लोणारींवर आक्षेप घेतल्याने दोघांमध्ये शाब्दिक चकमक झाली. त्यामुळे दोन्ही गट आमने-सामने आले. यावेळी इतर नगरसेवकांनीही या वादात उडी घेतल्याने सभागृहात मोठा तणाव निर्माण झाला होता. काहीवेळ सभेचे कामकाज थांबले होते. नगरसेवक संतोष चौधरी यांनी मध्यस्थी करून हा वाद मिटवला.

# चोपडा नगरपरिषदेचा पर्यावरणपूरक अन्नपूर्णा महोत्सवात २७ बचतगटांचा सहभाग

## पाच महिला ठरल्या विजेत्या; प्रथम २ हजार महिलांना मोफत स्टील वाटी वाटप

प्रतिनिधी । चोपडा

**येथील नगरपरिषदेमार्फत नगराध्यक्ष नम्रता पाटील व मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांच्या संकल्पनेतून माझी वसुंधरा अभियान ६.० व स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत प्रथमच आगळा वेगळा असा अन्नपूर्णा महोत्सव व पर्यावरणापूरक पाककला स्पर्धा दि.३ फेब्रुवारी रोजी आक्कासो शरदचंद्रिका सुरेश पाटील नाट्यगृह येथे सायंकाळी ४ वाजेपासून ते रात्री १० वा.पर्यंत माजी आमदार सौ.लताताई चंद्रकांत सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात संपन्न झाला.**



या कार्यक्रमाचे उद्घाटक नगराध्यक्षा नम्रता पाटील व प्रमुख पाहुणे म्हणून उपनगराध्यक्ष पंकज बोरोले, आरोग्य सभापती रमेश शिंदे, महिला बालकल्याण समिती सभापती देवयानी माळी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात ही हळदी-कुंकू कार्यक्रमाने झाली. यामध्ये माजी आमदार सौ.लताताई चंद्रकांत सोनवणे व नगराध्यक्षा नम्रता पाटील यांचे हळदी-कुंकू स्वच्छता निरिक्षक दीपाली साळुंके यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सर्व नगरसेविकांचे हळदी-कुंकू कार्यक्रम पार पडला.स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० व माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत आयोजित पर्यावरणपूरक पाककला स्पर्धा-२०२६ मध्ये ६० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धकांनी सादर केलेले पदार्थाची चव व त्यांची पर्यावरणपूरक सजावट प्रेक्षकांचे महत्वाचे आकर्षण ठरले. स्पर्धेकरिता परिक्षक म्हणून डॉ.धनश्री महाजन व महिला व बालकल्याण अधिकारी पूनम ठाकरे, अंतर्गत लेखापरिक्षक भारती पाटील यांनी जबाबदारी पार पाडली. माजी आमदार सौ.लताताई सोनवणे, नगराध्यक्षा नम्रता पाटील, मुख्याधिकारी रामनिवास झंवर व नगरसेविका यांनी सर्व स्पर्धकांची पदार्थांची चव व सजावट पाहुन सर्व स्पर्धकांचे कौतुक केले. यामध्ये पर्यावरणपूरक पाककला स्पर्धेचे विजेते प्रमिला छगन बडगुजर, रंजना विजय चौधरी, रुपाली पवन पाटील, किरण आनंदा चौधरी, अनिता संतोष पारधी हे ठरले तर ५ स्पर्धक यांना उत्तेजनार्थ ठरले.

कार्यक्रमाप्रसंगी माजी आमदार सौ.लताताई सोनवणे व नगराध्यक्षा नम्रता पाटील यांनी सांगितले की, महिलांसाठी चोपडा नगरपरिषदेमार्फत प्रथमच हळदी-कुंकू कार्यक्रम, पर्यावरणपूरक स्पर्धा व अन्नपूर्णा महोत्सव घेण्यात आला. यामध्ये गृहिणी, महिला बचतगट व नागरिक यांनी अतिशय उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी सांगितले की, महिला बचतगटांना स्वयंरोजगारासाठी चालना मिळावी, त्यांच्या उत्पादनांना चालना मिळावी हा मुख्य उद्देश होता. नगरपरिषद या पुढे दरवर्षी असा उपक्रम राबवेल असेही त्यांनी सांगितले. हळदी-कुंकू कार्यक्रमात प्रथम येणाऱ्या २००० महिलांकरिता स्टील वाटी वाण म्हणून वाटप करण्यात आली. सूत्रसंचालन प्रणव पाटील यांनी केले. कार्यक्रमाप्रसंगी सांस्कृतिक व क्रीडा सभापती अमोल पाटील, गटनेता रमाकांत ठाकुर, नगरसेवक प्रवीण देशमुख, नगरसेवक दीपक पाटील, नगरसेविका नेहा जैन, पूजा देशमुख, वंदना बाविस्कर, वैशाली पवार, परिविक्षाधीन मुख्याधिकारी सागर शेजुळ, उपमुख्याधिकारी संजय मिसर, कर निरिक्षक संदिप गायकवाड, शहर अभियान व्यवस्थापक गणेश पाठक, शहर समन्वयक स्वप्निल धनगर आदी उपस्थित होते.